# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ०७/०७/२०२३

चोरी

:-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टे राजापेठ<br><br>अप क्र. ६३७/२३ क. ३८० भादंवि | अमरावती | दि. 17/06/23 चे 07-00 वा. ते 06/07/2023 चे 17-30 वा. दरम्यान<br><br>दा. ता. वेळ<br><br>दि. 07/07/23 चे 02-41 वा. | एक महिला | अज्ञात | हकीकत असा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे परिवारासह एकत्र राहतात फि. चे घर तीन मजली आहे त्यापैकी तिस-या मजल्यावर फिर्यादी राहते. फिर्यादीची प्रकृती खराब असल्याने डॉ. यांनी फिर्यादीस १५ दिवस बेडरेस्ट दिल्याने व पाय-या चढण्यास मनाई केल्याने फिर्यादी चे सासरे खाली राहात असल्याने फिर्यादी तेथे राहण्यास गेली व फि. चे पती व मुलगी सुध्दा फिर्यादी सोबत राहण्यास गेली. फिर्यादीच्या घराचा जिना आतमधुन असल्याने घराच्यांशिवाय बाहेरचे कोणीही वर जावु शकत नव्हते. म्हणुन फिर्यादीने रोजचे वापरते सोन्याचे दागीने अलमारीत ठेवुन अलमारीला लॉक लावलेला नव्हता व बेडरूमची कडी लावुन खाली राहणास गेली . फि. च्या घराची फ्लोरींग फुटली असल्याने पावसाच्या आधी त्याचे काम करण्याकरीता फिर्यादीचे सासरे यांनी बेलपुरा येथील विक्की उर्फ नरम सोनोने यास सांगीतले.दि. २०/०६/२०२३ रोजी ११-३० वा. त्याने त्याचे सोबत दोन साथीदारासह काम करण्याकरीता आला त्यादिवशी गीट्टी,रेती वरच्या माळ्यावर चढवली काम पुर्ण केले व ते निघुन गेले. दि. २४/०६/२०२३ रोजी ०९-०० वा. कामावर आले फि.चे पती व जेठ आरामशीनमध्ये काम करत होते व सासरे वयोवृध्द असल्याने व फि. ला पाय-या चढण्यास मनाई केल्याने त्यांचेवर लक्ष देण्यास कोणीही नव्हते. विक्की हा त्याचे दोन साथीदारासह दुपारी ०२-०० वा. बांधकामाचे सामान घेवुन खाली आला व आम्हाला तुमचे काम परवडले नाही हे काम करत नाही आम्ही जात आहे. असे बोलल्याने फि. चे सासरे त्याची समजुन घालुन तुझ काम हे थोडच राहले ते पुर्ण कर व तुझे पैसे घेवुन जा. त्यावर विक्की ने म्हटले आम्हाला पैसे पण नाही पाहिजे. असे म्हणुन निघुन गेले . दि. ०६/०७/२०२३ रोजी ०५-३० वा. १५ दिवस बेडरेस्ट पुर्ण झाल्याने फिर्यादी वरच्या माळ्यावर गेली असता बेडरूमचा दरवाजा उघडा होता, आतमध्ये जावुन आलमारी उघडीत असतांना आलमाराचा हॅन्डल खालुन तुटलेले होते. ते कोणीतरी जोराने ओढले असावे. आलमारी उघडुन ड्रावर मध्ये ठेवलेले 1)सोन्याचे कानातले 02 रिंग 10 ग्रॅमचे , 2)सोन्याचे छोटे कानातले 02 रिंग 4 ग्रॅमचे, 3)सोन्याचे 04 लेडीज अंगठी प्रत्येकी 6 ग्रॅम, 4)सोन्याची चैन 15 ग्रॅम, 5)सोन्याचे कानातले 02 रिंग 10 ग्रॅमचे, 6)सोन्याचे 04 जेंटस अंगठी प्रत्येकी 6 ग्रॅम, 7)सोन्याचे 01 पेंडल 10 ग्रॅमचे, असा एकुण 97 ग्रॅम वजनाचे कि.अं.4,85,000 रू. चे दागिने दिसुन आले नाही. संपुर्ण आलमारी चेक केली मिळुन आले नाही ते कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले. अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | पोस्टे कोतवाली अप क्र २८६/२०२३ कलम ३७९ भादवि | अमरावती | घ.ता.वेळ. दिनांक ०६.०७.२०२३ चे १२.३० ते १३.३० वा दरम्यान<br><br>दा.ता.वेळ दिनांक ०७.०७.२०२३ चे १३.०७ वा | एक महिला | अज्ञात | मी समक्ष पोस्टेला येवुन जबाणी रिपोर्ट देते की मी बेंगलोर येथे माझे पतीसह राहते मी माझे आई वडील यांना भेटण्यासाठी अमरावती ला आली होती काल दिनांक ०६.०७.२०२३ रोजी १२.१५ ते १३.३० वा दरम्यान मी माझे जन्माचा दाखला काढण्या करीता महानगर पालीका अमरावती येथे गेली होती त्या ठिकाणी जन्माचा दाखला घेण्या साठी लोकांची लाईन होती त्या ठिकाणी महीलांची व पुरुषांची वेगवेगळी लाईन होती मी माझ्या जन्माचा दाखला घेण्यासाठी महीलांचे लाईन मध्ये उभी राहीली त्याठिकाणी माझे पाठीमागे एक मुलगी उभी होती माझ्या जवळ खांद्याला अडकवाची पर्स होती त्या पर्स मध्ये एक छोटी पींक कलर ची पर्स होती त्या मध्ये **2000** रुपयाचे २५ नोटा,सुट्टे ५०० रुपये असा एकुण ५०५०० रुपये कोणीतरी काढुन नेले आहे चोरी केले आहे माझ्या मागें उभी असलेल्या मुलीवर माझा संशय आहे, कायदेशीर कार्यवाही करण्या करीता मी पोस्टेला रिपोर्ट देत आहे हाच माझा जबाणी रिपोर्ट माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केला आहे मी वाचुन पाहीला बरोबर आहे अशा फीर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन व डी.ओ सा यांचे आदेशाने दाखल |
| ३ | पो. स्टे खोलापुरी गेट 125/2023 कलम 379 भा.द.वी | आदील अपार्टमेन्ट च्या बाजुला तालाबपुरा अमरावती | 05.07.2023 चे 20.00 ते 07.07.2023 चे11.30 वा पावेतो<br><br>दाखल<br><br>07.07.2023 चे 14.19 वा | मोईनुद्दीन इमदाद अली दवावाल वय 63 वर्ष व्यवसाय मजुरी , रा, आदील अपार्टमेन्ट च्या बाजुला तालाबपुरा अमरावती | अज्ञात | हकीकत आसा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांनी त्यांचा टाटा ACE कंपनीचा M-EL-H-1295 माल वाहक ऑटो असुन त्यांनी त्यांचा ऑटो बालाजी चिप्स कंपनी ला भाडे दिला नमुद घटना ता वेळी कंपनीचा ड्रायव्हर यांनी ऑटौ रात्री 08.00 वा दरम्यान फिर्याजी च्या घरा समोर उभा करुन निघुन गेला दिनांक 07.07.2023 रोजी सकाळी 1.30 वा दरम्या कंपनीचा ड्रायव्हर गाडी घेण्यास आला तर गाडी चालु झाली नाही गाडी चेक केली तर गाडीतील EXIDE कंपनी ची बॅटरी अंदाजे 2500/- और हायड्रोलीक जॅक कि 1000/- असा एकुण 3500/- रु चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला . फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ **विश्वासघात (फसवणुक) :-**

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टे कोतवाली अप क्र २८५/२०२३ कलम ४२० भादवि | अंबापेठ अमरावती | घ.ता.वेळ दि. १५.१२.२०१८ चे १०.०० वा ते दि. २८.०६.२०१९ चे १८.०० वा पावेतो<br><br>दा.ता.वेळ दि. ०७.०७.२०२३ चे १२.३१ वा | सुरेश गणपतराव बेंडे वय ६१ वर्ष धंदा - सेवानिवृत्त रा. छांगाणी नगर श्रीराम मंदीर जवळ रवी नगर अमरावती ह.मु. रोज ई मेहेर सोसाईटी सी वींग ब्लॉक नं ८०२ मधुबन कॉलनी राहटनी नकाते वस्ती पोस्टे पिंपरी चिंचवड ता. मुळशी जि. पुणे | प्रतापसिंह धनपसिंह राठोड वय ६० वर्ष रा. अंबापेठ अम. | मी समक्ष पोस्टेला येवुन जबाणी रिपोर्ट देते की मला माझ्या कडे काही पैशे असल्या मुळे शेती घ्याची असल्याने मी माझे मित्र सुधीर बाळकृष्ण झाडे ,सुनिल भावराव मोहोड यांना दिनांक १५.१२.२०१८ रोजी मी मला शेती घ्याची आहे कोणी शेती विकनार असेल तर मला सांगा असे त्यांना मी सांगीतले होते त्यानंतर या दोघांनी मला सांगितले की एक जण अडीच एक्कर शेती विकणार आहे त्यानंतर मझे मित्र सुधिर व सुनिल यांनी नंदा भैरव्यासिह रार्ठोड, भैय्यासिंह धनपतसिंह राठोड , प्रतापसिंह धनपतसिंह राठोड , मनोज राधावल्लभजी भट्टड यांचे नावे असलेला मौजे मासोद ता. जि.अमरावती येथील क्षेत्रफळ २.६२ आर या शेती मधिल एकुण १ हेक्टर इतक्या क्षेत्रफळाची शेती विक्री करण्या करीता माझे कडुन प्रतापसिंह धनपतसिंह राठोर रा. अंबापेठ अम. यांचेशी सुधिर व सुनिल यांनी बोलने करुन दिले त्यावरुन मी प्रतापसिंह धनपतसिंह राठोड याला त्याचे राहते घरी अंबापेठ अमरावती येथे सदरची शेती घेण्या साठी वेळो वेळी २३ लाख रुपये ऑनलाईन, चेक, आर.टी.जी.एस. व्दारे नगदी १४ लाख रुपये असे एकुण ३७ लाख रुपये प्रतापसिंह धनपतसिंह राठोड याला दिले त्यापैकी शेती ची खरीदी चा सैदा २७.५ लाख रु. चा झाला होतो व प्रतापसिंह धनपतसिंह राठोड याला काही काम असल्या मुळे ९.५लाख रुपये उसनवारी दिले होते त्या शेतीची याने १०० रुपये चे बॉंडवर एकुण ३ टोकन चिठ्ठी करुन दिली त्या पैकी एका १०० रुपयेच्या स्टॅम्प वर ०५.०२.२०१९ रोजी नमुना येथे कोल्हटकर यांचे कडे नोटरी करुन दिली व त्या सोबत वर नमुद मालमत्तेचा गाव नमुना सात बारा दिला होता त्या नंतर प्रतापसिंह धनजसिंह राठोड यांनी सांगितले की काही दिवसांनी तुम्हाला वर नमुद शेतीची खरीदी करुन देवु परंतु प्रतापसिंह धनजसिंह राठोड यांनी मला शेतीची खरीदी करुन दिली नाही म्हणुन मी वारंवार सुनिल मोाहड यांना घेवुन प्रतापसिंह धनजसिंह राठोड यांचे शी बोलणी केली परंतु मला प्रतापसिंह धनजसिंह राठोड याने शेतीची खरीदी करुन दिली नाही व आता पर्यंत माझे मी दिलेले शेतीचे खरीदी करीता दिलेले २७.५ लाख व उसनवारी दिलेले ९.५ लाख रुपये असे एकुण ३७ लाख रुपये परत दिले नाही प्रतापसिंह धनजसिंह राठोड याने माझे कडुन शेती खरीदी करुन देतो असे बतावणी करुन ३ टोकण चिठ्ठी करुन माझ ाे कडुन २७.५ लाख व उसनवारी दिलेले ९.५ लाख रुपये असे एकुण ३७ लाख रुपये परत न देता प्रतापसिंह याने सदर शेती इतरांना विक्री करुन माझी फसवणुक केली आहे म्हणुन मी कायदेशीर कार्यवाही करीता प्रतापसिंह धनपसिंह राठोड रा. अंबापेठ अमरावती यांचे विरुध्द तक्रार देत आहे हाच माझा जबाणी रिपोर्ट आहे माझा जबाणी रिपोर्ट माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केला आहे मी वाचुन पाहीला बरोबर आहे. अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन व आर्थिक गुन्हे शाख अमरावती यांचे कडुन यांचे कडुन गुन्हा दाखल करण्याचा आदेश आल्याने ,डी.ओ सा यांचे आदेशाने दाखल |

➢ ईतर :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | **124/2023 कलम 498(अ), 34 भा.द.वी** | अमरावती | **04.05.2022 चे 14.00 ते दिनांक 07.07.2023 चे 12.00 वा पावेतो दाखल 07.07.2023 चे 13.21 वा** | एक महिला | पिडीत महिलेचा नवरा 2) एक महिला 3) पिडीत महिलेचा सासरा वर्ष तिन्ही रा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हिने तिचे आई सह पो. स्टे ला येवुन जबानी रिपोर्ट दिला की फिर्यादी चे लग्न आरोपी क्र 1 सोबत रिती रिवाजा झाले असुन यातील आरोपी क्र 1 फि चा नवरा असुन तो दारु पिण्याचा सवीयीचा आहे. लग्ना नंतर एक महीना चांगली वागणुक दिली. फिच्या नवरा हा घरगुती कारणा वरुन शिवीगाल करुन भांडण करतो . फि. चे आई समोर सुध्दा शिवीगाळ केली फि ने शिवीगाळ करु नका म्हटले असता यातील फि ची सासु हिने माझा मुलगा तुला शिवीगाळ करणार तु चुपचाप येकुन घे नाहीतर येथे राहु नकोस व आईला फोन करायला मनाई करते म्हणुन फिर्यादी ही आई कडे राहयला गेली तेव्हा काही दिवसांनी परत सासरी राहायला गेली तेव्हा नवरा , सासु, सासरे यांनी भांडण केले शिवीगाळ केली फि ला शाररीक व मानसिक छळ केला.असे फिर्यादी चे जबानी रिपोर्ट वरुन न महीला सेल यांचे लंखी पत्रा वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ प्रोव्हीशन रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर | अप क्र. ४९७/२०२३ क.६५(ई)म दाका | यशोदा नगर नं.०१ गल्ली नं.४अमरावती | दि.०७/०७/२०२३ चे १२.५० वा | दि.०७/०७/२०२३ चे १४.५० वा | नापोकॉ हरिश हिरालाल चौधरी ब.नं. ९६९ पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर | राजेश उर्फ राजा फुलचंद गौतम (तिवारी) वय ३५ वर्ष, राय यशोदा नगर नं. ०१ गल्ली ०४ अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर येथे तैनातीस असुन ते मा.व.पो.नि. याचे आदशाने पो.स्टे. हद्दित डि बी पथकातील कर्मचारी सह पेट्रोलींग करित असतांना एका गुप्त बातमीदारा कडुन खात्रीलायक खबर मिळयावरुन नमुद घ.तावेळी व ठिकाणी आरोपी इसम याचे वर प्रो.रेड केली असता पंचासमक्ष त्याचे ताब्यातुन १०नग देशी दारुच्या १८० एम.एल च्या संत्रा बॉबी कंपनीच्या पावट्या कि.अं.८००/-रु.चा प्रोव्ही माल जप्त करण्यात आला नमुद आरोपी याचे कृत्य कलम ६५(ई) म.दा.का. प्रमाणे होत असल्याने त्याचे विरुध्द सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर | अप क्र. ४९८/२०२३ क.६५(ई)म दाका | यशोदा नगर नं.०१ गल्ली नं.४अमरावती | दि.०७/०७/२०२३ चे १२.०५ वा | दि.०७/०७/२०२३ चे १५.१६वा | नापोकॉ हरिश हिरालाल चौधरी ब.नं. ९६९ पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर | गणेश किसन लादे वय ४७ वर्ष, रा. यशोदा नगर नं. ०१ गल्ली ०४ अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर येथे तैनातीस असुन ते मा.व.पो.नि. याचे आदशाने पो.स्टे. हद्दित डि बी पथकातील कर्मचारी सह पेट्रोलींग करित असतांना एका गुप्त बातमीदारा कडुन खात्रीलायक खबर मिळयावरुन नमुद घ.तावेळी व ठिकाणी आरोपी इसम याचे वर प्रो.रेड केली असता पंचासमक्ष त्याचे ताब्यातुन ०९नग देशी दारुच्या १८० एम.एल च्या संत्रा बॉबी कंपनीच्या पावट्या कि.अं.७२०/-रु.चा प्रोव्ही माल जप्त करण्यात आला नमुद आरोपी याचे कृत्य कलम ६५(ई) म.दा.का. प्रमाणे होत असल्याने त्याचे विरुध्द सदरचा गुन्हा दाखल |
| 3 | भातकुली | अप क्र.131/23 कलम 65 ई म.दा.का | ग्राम हरताळा | दि.07/07/23 चे 13.00 वा ते 13.10 वा दरम्यान | दि.07/07/23 चे15.17 वा. | ए.एस आय मधुकर धनोकार ब.नं-763 पोस्टे भातकुली अमरावती शहर | गंगाधर श्रीकृष्ण पडोळे वय-65 वर्ष रा- ग्राम हरताळा ता-भातकुली अमरावती शहर | भातकुली हकिकत अशा प्रकारे आहे कि नमुद घ.ता.वेवी ठिकाणी पोस्टे स्टॉंफ सह यातील नमूद आरोपीवर प्रो रेड केली असता आरोपीचे ताब्यातुन जप्ती पंचनाम्याप्रमाणे 22 नग 180 एम.एल पावट्या कि.अं-1760 रु. चा प्रोव्ही माल असा प्रोव्ही माल मिळुन आल्याने सदर आरोपीविरूद्ध 65 (ई) म.दा.का प्रमाणे गुन्हा दाखल |

➢ **अकस्मात मृत्यु :-**

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ८ |
| १. | पोस्टे राजापेठ<br>मर्ग क्र. ६९/२३ क. १७४ जा.फौ. | घ.ता.वेळ - दि. 06/07/2023 चे 18-55 वा.<br><br>दि. 07/07/2023 चे 00-05 वा. | मंगेश किसनराव ठवकर वय २८ वर्ष रा. जुना सातुर्णा अमरावती | राजेश किसनराव ठवकर वय ३२ वर्ष रा. जुना सातुर्णा अमरावती | नक्कल जबानी रिपोर्ट पो.स्टे. राजापेठ दि. ०६/०७/२०२३ राजेश किसनराव ठवकर वय ३२ वर्ष रा. जुना सातुर्णा अमरावती मी समक्ष पो.स्टे. ला येवुन जबानी रिपोर्ट देतो की, मी वरील नमुद ठिकाणी कुंटुंबासह राहते व फळाची गाडी साईनगर चौकात लावतो. मी दि. ०६/०७/२०२३ रोजीचे सायंकाळी १८-४५ वा. शजारी राहणा-या इसमाने फोनकरून सांगीतले की, तुझा लहान भाऊ मंगेश किसनराव ठवकर वय २८ वर्ष रा. सातुर्णा अम. याने त्याचे राहते घरी नायलॉन दोरीने स्लॅपचे लोखंडी कडीला गळफास घेतला आहे. वरून तात्काळ घरी गेलो असता फिर्यादीला त्याचा भाऊ फाशी घेतलेला दिसला. लगेच शेजारच्या मदतीने फाशीची गाठ सोडुन बाहेर काढुन वाचेल या उद्देशाने काढले व पोलीसांना फोन करून कारवाई करीता रिपोर्ट देत आहे. अशा फि. च्या जबानी रि. वरून सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला. |